**प्रेस नोट दिनांक २४/०५/२०१९**

**वारजे माळवाडी पोलीस स्टेशन**

**रिक्षात विसरून राहिलेला मोबाईल महिलेस परत**

काल दिनांक २३/०५/१९ रोजी रात्रौ २०.०० वा चे सुमारास रिक्षा नंबर एम.एच. १२ डि.टी. ३१४० वरील चालक नामे हिरालाल सरोज रा. शिवणे, पुणे यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यास येऊन सहा.पो.फौज. हरीश्चंद्र केंजळे यांचेकडे अंदाजे १०,०००/-रू किंमतीचा इनफिनिक्स कंपनीचा मोबाईल फोन हजर केला व कळविले की, हा मोबाईल मला माझ्या रिक्षात मिळून आला आहे. तो कोणाचा आहे ते मला माहिती नाही. कदाचित माझे रिक्षात प्रवासी म्हणून बसलेल्या कोणाचा तरी असावा.

सदर हजर केलेल्या मोबाईलची पाहणी केली असता, त्याची बॅटरी पूर्ण डाऊन झालेली होती. म्हणून प्रथम मोबाईल चार्ज करून घेतला. त्यानंतर सदर मोबाईल मध्ये पाहणी केली असता, तो पॅटर्न लॉक असल्याने त्यामध्ये असलेले फोन नंबर किंवा त्यामध्ये असलेल्या सिमकार्डचा नंबर मिळून आला नाही. म्हणून पो.शि. संग्राम केंद्रे यांनी अथक प्रयत्न करून मोबाईलचे पॅटर्न लॉक उघडून त्यामध्ये असलेल्या सिमकार्डचा नंबर मिळवून फोन लावला असता, महिला नामे सौ. शितल संतोष अंबले रा. एस/३०, अरविंद सोसायटी, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे ५१ यांनी फोन घेतला. त्यावेळी त्यांना त्यांचा मोबाईल नंबर विचारून त्यांचा मोबाईल फोन त्यांच्याकडे आहे का अशी विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, आज रोजी दुपारचे वेळी मी माझ्या सास-यांना घेऊन दवाखान्यात चालले होते. त्यावेळी मी रिक्षा केली होती. माझा मोबाईल फोन बहुदा रिक्षा मध्ये राहिला असावा. तेव्हा त्यांना तुम्ही मोबाईल हरविलेबाबत तक्रार दिली आहे का ? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मोबाईल रिक्षा मध्येच राहिला असलेबाबत खात्री नव्हती तसेच हरविलेला मोबाईल मिळणारच नाही म्हणून मी कोठेही तक्रार दिलेली नाही असे सांगितले. तेव्हा त्यांना त्यांचा मोबाईल फोन हा रिक्षामध्येच राहिला होता. रिक्षा चालकाने तो आणून वारजे माळवाडी पोलीस ठाण्यास हजर केला आहे. त्यांना वारजे माळवाडी पोलीस ठाण्यास येऊन तुमचाच मोबाईल असलेबाबत खात्री पटवून घेऊन जाण्यास कळविले असता, त्यांनी त्या तनिष्क दुकानात नोकरीस असून मला आठ हजार रूपये पगार आहे. परंतु मी कामाला खाडा करून पोलीस स्टेशनला आले तर माझा पगार कट होईल म्हणून मी माझ्या मुलाला मोबाईलची पावती घेऊन पाठविले तर चालेल का ? अशी विचारणा केल्याने त्यांना त्यांच्या मुलाला पाठवून देण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांचा मुलगा सौरभ अंबले हा वारजे माळवाडी पोलीस ठाण्यास हजर झाला व मोबाईलची पावती दाखविली. सदर मोबाईल हा त्यांचाच असलेबाबत खात्री करून त्यांच्या ताब्यात दिला आहे. हरविलेला मोबाईल रिक्षा चालकाच्या प्रामाणिकपणा व पोलीसांच्या तत्परतेने २४ तासाच्या आत परत मिळाल्याने त्यांनी पोलीसांचे व रिक्षा चालकाचे आभार मानले.